**Estd 1962**

**Naac 'A+++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दि.३०/३/२०२२

कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर २०२१ हिवाळी सत्राच्या **३६२** परीक्षांना दि.१४ फेब्रुवारी २०२२ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरवात झाली आहे.

आज दि. **३० मार्च २०२२** रोजी B.Tech या अभ्यासक्रमाच्या एकुण **०३** विषयांच्या परीक्षा पार पडल्या. आजच्या **परीक्षेसाठी २३०** विद्यार्थ्यापैकी **२२७** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. परीक्षेस विद्यार्थ्याच्या उपस्थितीचे प्रमाण हे शेकडा **९८.७० टक्के** इतके होते.

आज परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यापैकी एकुण ०२ विद्यार्थी परीक्षा देत असताना संशयास्पदरित्या हालचाल करताना विद्यापीठाच्या विशेष पथकास आढळून आले असून त्यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

आज दि.३० मार्च २०२२ रोजी **M.Com. Sem- 3, M.Sc. Tech.(Maths) Sem. 1, 2 & 3, M.Sc. (Food Sc. & Tech.) Sem – 1, M.Sc. (Alcohol Tech) Sem – 1, M.Sc. (Env. Sc.) Sem – 1, M.Sc. (Applied Statistics & Inf. Sc.) Sem – 1, M.Sc. (Statistics) Sem – 1, M.Sc. (Sugar Tech.) Sem – 1, M.Sc.(Food Sc. & Nutrition) Sem – 1, BBA Sem. 4, 5 & 6, BCA Sem 3,4, & 5, M.A. (Marathi) Sem 1 & 2, LLB 3 Year Law Pattern 70:30 Sem 1 (Repeater), LLB 3 Year Law Pattern 70:30 Sem 1, 2, 3 & 4, LLB 3 Year Law Pattern 100 – 1, 2, 3, 4, 5 & 6, LLB 5 Year Law Pattern 70:30 Sem 1, 2, 3, 4 & 5, LLB 5 Year Law Sem – 1, LLB 5 Year Law Pattern 80:20 Sem – 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9 & 10** अशा एकुण —— परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले असून **आजपर्यंत एकुण** —— परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत.

दि.१४ फेब्रुवारी २०२२ पासून हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत. तथापि ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देताना काही तांत्रिक कारणास्तव काही विषयाचे पेपर देता आलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी परीक्षा न देवू शकलेल्या पेपरची माहिती/तपशिल खालील लिंकद्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीमध्ये सादर करण्यात यावी. सदरची लिंक ही दि.२३/३/२०२२ ते दि.१/४/२०२२ या कालावधीपूरतीच खुली करण्यात आलेली आहे, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांची सद्यस्थितीत परीक्षा चालू आहे अशा विद्यार्थ्यांना पेपर देताना तांत्रिक अडचण आली असेल तर संबंधित परीक्षा संपल्यानंतर खालील लिंकद्वारे त्याबाबतची माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

**unishivaji.ac.in/online.unishivaji.ac.in या वेबसाईट पोर्टलवर –**

**Link –**

**http:/studentapps.unishivaji.ac.in/oct21Re-exam**

या परीक्षेपासून विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा–या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रॉक्टरींग पध्दत सुरु केली आहे. यासाठी विद्यापीठाकडून विशेष पथक नेमण्यात आले आहे. सदर पथकाकडून आज कामकाज करुन प्रत्यक्ष हेडफोन वापरुन गैरप्रकार करणा–या, अन्य मोबाईल वापरुन इतरांशी दूरध्वनीवरुन बोलणारे, एकाच फ्रेममध्ये दोन विद्यार्थी दिसणारे इ. अशा विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करुन परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचे पाविज्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच ऑनलाईन परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री. गजानन पळसे यांनी दिली.